दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
• वर्ष १६ वे • अंक ३५४ • MAHMAR/2006/17212 • रायगड • सोमवार दि.२१ मार्च २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## रायगड किनाऱ्याला चक्रीवादळाचा धोका नाही; जिल्हाधिकारी कार्यालयाकडून माहिती

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड किनाऱ्यालगत कुठेही चक्रिवादळाचा धोका नाही अशी माहिती रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाकडूल सांगण्यात आले आहे.

अंदमान निकोबार व बंगालचा उपसागर या भागातील हवामान बदलामुळे त्या समुद्रकिनारी भागात वादळसदृश्य परिस्थिती उद्भवण्याचा धोका हवामान खात्याने वर्तविला आहे. अशी परिस्थिती उद्भवल्यास तेथील मच्छीमारांच्या बोटींना आपल्या सागर किनारी भागात आश्रय देण्याविषयी विनंती करण्यात आलेली आहे.

असे असले तरी रायगडमध्ये कोठेही चक्रीवादळाचा धोका नाही अशी माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

### चवदार तळे सत्याग्रह वर्धापनदिनी डॉ.बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी हजारों आंबेडकर प्रेमींची उपस्थिती

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा अधिकाधिक प्रसार करण्याचा प्रयत्न : ना.आदिती तटकरे

### चवदार तळे ऊर्जा स्रोतच : गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

**जातीयवादाची दरी संपुष्टात यावी, यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दि.२० मार्च १९२७ रोजी महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह करून सामाजिक क्रांतीचे रणशिंग फुंकले होते. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा अधिकाधिक प्रसार करण्याचा प्रयत्न पालकमंत्री या नात्याने माझ्याकडून आणि शासनाकडून निश्चितच केला जाईल, असे प्रतिपादन पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी आज महाड येथे केले.**

चवदार तळे सत्याग्रह या ऐतिहासिक घटनेच्या स्मृतीनिमित्त आज चवदार तळे सत्याग्रहाचा ९५ वा वर्धापनदिन महाडमध्ये साजरा करण्यात आला, त्या कार्यक्रमानिमित्त पालकमंत्री कु. आदिती तटकरे बोलत होत्या. यावेळी गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांनीही चवदार तळे येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करीत अभिवादन केले.

पालकमंत्री ना.कु.आदिती तटकरे म्हणाल्या, दि.२०मार्च १९२७ रोजी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी महाड मधील चवदार तळे येथे पाण्याचा सत्याग्रह केला. तो केवळ अस्पृश्यांना पिण्याचे पाणी खुले करून देण्यासाठी दिलेला लढा नव्हता तर त्यांच्या मूलभूत न्याय्य हक्कासाठी दिलेला लढा होता. जुलै २०२१ महिन्यात आलेल्या महापूरात चवदार तळेही वाचले नाही. त्यानंतर चवदार तळ्याची साफसफाई करण्यासाठी स्थानिक प्रशासन, महाड नगरपालिका व ठाणे महानगरपालिकेचे मोठे योगदान होते. चवदार तळ्यातील पाणी शुद्धीकरणासाठी जी यंत्रणा बसविण्यात आली आहे, त्याचे उद्घाटन सामाजिक न्याय मंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या हस्ते लवकरच केले जाणार आहे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार अधिकाधिक प्रसारित करण्याचा प्रयत्न शासनाकडून केला जाईल.

यावेळी गृहनिर्माण मंत्री ना.जितेंद्र आव्हाड म्हणाले की, माणसाला माणूस म्हणून जगता यावे, त्याला पाण्यापासून वंचित ठेवता येणार नाही, हा संदेश चवदार तळे सत्याग्रहाच्या माध्यमातून संपूर्ण जगाला दिला गेला. म्हणून चवदार तळे हे उर्जा स्तोत्र आहे. ते म्हणाले, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दि.२० मार्च १९२७ रोजी पुकारलेला लढा हा माणुसकी नसलेल्या समाज व्यवस्थेविरोधातील अजरामर लढा होता. या लढ्याच्या वेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संरक्षणासाठी महाड मधील काही सवर्ण पुढे आले आणि त्यांनी आजूबाजूच्या परिसरातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर हल्ला करण्यासाठी जे सनातनी आले होते, त्यांना परतवून लावले. हा भारताच्या इतिहासातील टर्निंग पॉईंट ठरला होता. अन्याय-अत्याचाराविरोधात आवाज उठविलाच पाहिजे, हे बाबासाहेबांनी त्या काळी सांगितले. अस्पृश्य समाजाला समाज व्यवस्थेमध्ये पाणीही पिऊ द्यायचे नाही, या माणुसकीहीन संस्कृती व्यवस्थेविरोधात उभारलेला हा लढा होता. या वर्धापन दिनानिमित्त दि.१९ मार्चपासूनच हजारो अनुयायी महाडमध्ये दाखल झाले. सकाळपासूनच चवदार तळ्यातील पाणी प्राशन करण्यासाठी तसेच चवदार तळे व क्रांती स्तंभावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यासाठी हजारो भीमसैनिक, आंबेडकर प्रेमी, राजकीय नेते, पदाधिकारी मोठ्या संख्येने जमले होते. येथे जमलेल्या डॉ.आंबेडकर यांच्या अनुयायींसाठी अल्पोपहार, जेवण, पाणी, वैद्यकीय सुविधा याची उत्तम व्यवस्था चवदार तळे विचार मंच महाड, पोस्ट कर्मचारी संघटना तसेच विविध शासकीय, अशासकीय यंत्रणा, सामाजिक संघटना, संस्थांच्या वतीने करण्यात आली होती.

## बैलगाडी शर्यती बाबत नेरळ पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील मौजे उक्रूळ येथे १८ मार्च २०२२ रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैलगाडी शर्यती आयोजकांनी रायगड जिल्हाधिकारी यांची कोणतीही परवानगी न घेता आयोजित केलेल्या बैलगाड्या शर्यत त्यांना चांगलीच महागात पडली आहे यामध्ये एकाच मृत्यू झाल्याने बैलगाडी शर्यत आयोजकांवर नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कर्जत तालुक्यातील मौजे उक्रूळ येथे दि. १८ मार्च २०२२ रोजी सकाळी १०:३० ते ३:०० वा च्या सुमारास बैलगाडी शर्यत आयोजकांनी बैलगाडी शर्यत करीता लागणारी मा.जिल्हाधिकारी यांची कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता बैलगाडी शर्यतीचे आयोजन करून घटनेच्या ठिकाणी शेकडो प्रेक्षकांचा बेकायदेशीर जमाव जमवून जमावबंदी आदेशाचे उल्लंघन केले तसेच आयोजकांनी कोरोना विषाणूचा फैलाव होऊ नये या करीता कोणतीही उपाययोजना न केल्यामुळे शर्यतीच्या ठिकाणी बैलगाडी शर्यत बघण्यासाठी उपस्थित असलेले दौलत बाजीराव देशमुख (वय ६६ वर्षे) रा.चोचीची वाडी कर्जत यांना बैलगाडी शर्यती चालू असताना अज्ञात आरोपीच्या बैलगाडीची ठोकर लागल्याने ते जागीच मृत्युमुखी झाले.

या बाबत नेरळ पोलीस ठाणे येथे गु.र.नं.८१/२०२२ भा.द.वि कलम ३०४ अ,२७९,३३७, ३३८, १८८, २६९, २७०, २७१, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१) चे उलंघन १३५ आपत्ती व्यवस्थापन कायदा कलम ५,१, प्राण्यांना क्रूरतेने वागणूक प्रतिबंध कायदा १९६० चे कलम ११(१),(क) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस निरीक्षक तेंडूलकर हे वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तपास करीत आहे.

## बालाजी सिंपोनीतील जळीत महिला मृत प्रकरणाचा खांदेश्वर पोलिसांनी केला उलगडा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सुकापूरमधील बालाजी सिंपोनी मध्ये झालेल्या जाळीत कांडचा खांदेश्वर पोलिसांनी छडा लावला आहे. हा सर्व प्रकार पैशाच्या मामल्यातून झाला असल्याचे निष्पन्न झाले आहे.

बालाजी सिंपोनी या रहिवाशी संकुलात रुम नं.२८०५ मध्ये सरिता महेश पताडे यांच्यासोबत गौरी शंकर केदारी राहत होते. गौरी केदारी यांनी मोहिनी धनंजय ढमढेरे यांच्याकडून सरकारी नोकरीला लावते म्हणून पैसे घेतले होते. हे पैसे वसुल करण्यासाठी मोहिनी ढमढेरे व धनंजय आंद्रे हे बालाजी सिंपोनीत गेले व गौरी हिला घाबरविण्यासाठी मोहिने हिने बाटलीत पेट्रोल व मेणबत्ती सोबत घेतली होती. रुममध्ये जाऊन गौरीकडून पैशाची मागणी करुन तिला पेट्रोल आणि मेणबत्तीची भीती दाखवली. यावेळी सरिता पताडे यांनी मध्यस्ती करत गौरीला वाचविण्याचा प्रयत्न केला. यावेळी झालेल्या झटापटीत बाटलीतील पेट्रोल सरिता पताडे यांच्या अंगावर सांडून आगीचा भडका उडाला. या घटनेमध्ये सरिता पताडे पूर्णपणे भाजल्या व त्यांचा जागीच मृत्यू झाला. या नंतर मोहिनी ढमढेरे व धनंजय आंद्रे तेथून पसार झाले. गुंतागुतीच्या या प्रकरणाचा खांदेश्वर पोलीसांनी तपास करुन मोहिनी ढमढेरे व धनंजय आंद्रे यांचा शोध घेतला व एकाला ताब्यात घेतले आहे.

## दंडाच्या नावाखाली पनवेल महानगरपालिकेत होतोय लाखोंचा गैरव्यवहार

### विरोधी पक्षनेते प्रितम जनार्दन म्हात्रे यांचा आरोप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दंड म्हणून वसूल केलेल्या पैशांमध्ये नागरिकांना घाबरवून पावतीपेक्षा जास्त पैसे उकळून दररोज मोठा गैरव्यवहार होत आहे असे आरोप विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे यांनी केले आहेत. त्याबद्दल माहिती देताना त्यांनी सांगितले की, गेले काही दिवस पनवेलमधील नागरिकांच्या त्यांच्याकडे तक्रारी आल्या होत्या की, पावती कमी रकमेची देऊन जास्त पैसे उकळले जात आहेत, परंतु यासंदर्भात कोणताही पुरावा त्यांच्याजवळ नव्हता म्हणून प्रीतम म्हात्रे यानी त्यांच्या काही सहकाऱ्यांना सांगितले होते की या संदर्भात थोडी माहिती घ्या. शनिवार दिनांक १९ मार्च २०२२ रोजी पनवेल एस.टी. स्थानक आणि पनवेल



रेल्वे स्थानक परिसरात पनवेल महानगर पालिकेचे अधिकृत असलेले मार्शल ज्यांच्याजवळ पालिकेची रिसीट देण्याचे अधिकृत मशीन आहे आणि पालिकेचे ओळखपत्र सुद्धा आहे ते नागरिकांकडून, तेथील फेरीवाले तसेच दुपारच्या वेळी ट्रेनने प्रवास करणाऱ्या सर्वसामान्य लोकांकडून जास्त पैसे उकळण्याचे काम करत आहेत, हे समजताच त्याठिकाणी जाऊन कार्यकर्त्यांनी त्यांना

.../२

## संक्षिप्त...

### 'एमआयएम' सोबत जाण्याच्या चर्चेला शरद पवारांचा पूर्णविराम



**बारामती : वृत्तसंस्था**

कुणी कुठल्या पक्षासोबत जायचं हे ते स्वत: सांगू शकतात. परंतु ज्यांच्यासोबत जायचंय त्या पक्षाने तरी होकार दिला पाहिजे. हा राजकीय निर्णय आहे. हा निर्णय महाराष्ट्रापुरता कुणी प्रस्तावित केला असला तरी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष म्हणून अशा प्रकारचा राजकीय निर्णय राज्याला घेण्याचा अधिकार देत नाही. राज्याला या निर्णयाबाबत राष्ट्रीय समितीने स्पष्ट करेपर्यंत कोणत्याही राज्यात अशा प्रकारची भुमिका ते घेऊ शकत नाहीत. त्यामुळं महाराष्ट्रात गेली दोन दिवस जो एमआयएमबाबत ज्या बातम्या येतायत. तो पक्ष निर्णय नाही, अशा शब्दात ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी 'एमआयएम'सोबत जाण्याची शक्यता नसल्याचे सांगितले.


एमआयएम चे खासदार इम्तियाज जलील यांनी 'एमआयएम'ला महाविकास आघाडीत सामील करून घेण्याचे आवाहन आघाडीच्या नेत्यांना केले आहे .या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या राजकीय चर्चेला पवार यांनी राष्ट्रवादीच्या वतीने पूर्ण विराम दिला आहे. माळेगाव येथील निवासस्थानी पत्रकारांशी पवार बोलत होते.

## पावणे पाच कोटी किमतीचे १२०० ड्रोनचा साठा जप्त

**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीटी बंदरातुन रक्तचंदनानंतर आता चीनच्या बंदी घालण्यात आलेल्या खेळण्यातील ड्रोनच्या तस्करीला सुरुवात झाली आहे.न्हावा -शेवा सीमा शुल्क विभागाच्या क्राइम इंटेलिजेंस युनिटच्या अधिकाऱ्यांनी इंधन पंपाच्या नावाने आयात करण्यात आलेले १२०० ड्रोनच्या साठा एका ४० फुटी कंटेनरमधुन ताब्यात घेण्यात आला आहे.तस्करी मार्गाने आयात ड्रोनची किंमत सुमारे पाच कोटींच्या घरात आहे.याआधीही डीआरआयच्या विभागाने ३६ ड्रोनचा साठा जप्त केला होता.

जेएनपीटी बंदरातुन याआधी सोने, चांदी, शस्त्रास्त्रे, अमली पदार्थ, सापांची कातडीची मोठ्या प्रमाणावर तस्करी केली जात होती. त्यानंतर मागील काही वर्षांपासून आखाती देशात निर्यात होणाऱ्या रक्तचंदनाच्या तस्करीला उधाण आले आहे.त्यानंतर आता देशात बंदी घालण्यात आलेल्या चीनच्या ड्रोनच्या तस्करीला सुरुवात झाली आहे. न्हावा-शेवा बंदरातील क्राइम इंटेलिजेंस युनिटने बंदी नंतरही चीनमधून तस्करी मार्गाने आयात करण्यात आलेला १२०० ड्रोनच्या साठा कारवाई करत नुकताच जप्त केला आहे.



चीनमधुन खेळणी आणि इंधन पंपाच्या नावाने हा ड्रोनचा साठा जेएनपीटी बंदरामार्गे एका एजन्सी मार्फत आयात करण्यात आला होता. खबऱ्याकडून मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारावरच बंदीनंतर इतक्या मोठ्या प्रमाणावर ड्रोनचा साठा जप्त करण्याची ही पहिलीच वेळ आहे.या १२०० ड्रोनची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पावणे पाच कोटींच्या घरात आहे. याआधीही जेएनपीटी बंदरातुन चीनमधुन आयात करण्यात आलेल्या १४.११ लाख किमतीचा ३६ ड्रोनचा साठा जप्त करण्यात आल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी दिली आहे.

देशातील ड्रोनच्या देशांतर्गत उत्पादनाला चालना देण्याच्या प्रयत्नांचा भाग म्हणून भारत सरकारने काही अपवादांसह परदेशी ड्रोनच्या आयातीवर बंदी घातली आहे. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या अंतर्गत फॉरेन ट्रेड महासंचालनालयाने गेल्या महिन्यात परदेशी ड्रोनच्या आयातीवर बंदी घालणारी अधिसूचना जारी केली आहे. देशात आयातीवर बंदी घालण्यात आलेल्या या चिनी बनावटीच्या ड्रोनची तस्करी करण्यासाठी तस्करांनी न्हावा शेवा असे सांकेतिक नाव दिले आहे.याच सांकेतिक नावाने या ड्रोनची तस्करी केली जात असल्याचे अधिकृत सूत्रांकडून सांगण्यात येत आहे.

## गिरणे गाव आता आत्मनिर्भर बनले आहे : खा.सुनील तटकरे

### गिरणे सरपंच ज्योती पायगुडेसह कैलास पायगुडे यांचा राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये जाहीर प्रवेश



**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुक्यातील गिरणे गावातील ग्रामस्थ आणि युवक यांनी भाजपा माजी तालुका अध्यक्ष कैलास पायगुडे आणि लोकनियुक्त सरपंच सौ.ज्योती पायगुडे यांच्या नेतृत्वाखाली एकत्र येऊन गावाचा पूर्वीचा इतिहास बदलून गावाच्या विकासासाठी सर्व युवक एकत्र आल्याने गिरणे गावाचा चेहरामोहरा बदलून टाकून गाव आता आत्मनिर्भर बनला,असे प्रतिपादन रायगडचे लोकप्रिय खा.सुनील तटकरे यांनी गिरणे येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन व उद्घाटन करताना केले. यावेळी तालुका अध्यक्ष नाना भौड, राजीप महिला व बालकल्याण सभापती सौ.गीता जाधव, पंचायत समिति माजी सभापती सौ. अक्षरा कदम माजी उपसभापती गणेश वाघमारे, राजिप सदस्य बबन चाचले, नगराध्यक्षा अस्मिता भोरावकर, उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे,युवक अध्यक्ष नागेश लोखंडे चंद्रकांत भोरावकर, ॲड.उत्तम जाधव राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तालुक्यातील गिरणे गावातील लोकार्पण सोहळाप्रसंगी खा.तटकरे बोलत होते. यावेळी खा.तटकरे यांची मिरवणूक काढण्यात आली. गिरणे येथे संरक्षक भिंत बांधणे कामाचे उद्घाटन, नानवली गाव रस्त्याचे डांबीकरण

.../२

## घरातले प्रदुषित पाणी अंबा नदीत; तेच पाणी पुन्हा नागरिकांच्या घरात

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

पाली शहरातील सांडपाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता ते सरळ अंबा नदीपात्रात सोडले जाते. त्यामुळे हेच पाणी पिणारे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे चित्र पाली शहरात पहायला मिळत आहे. कोणताही पाणी शुद्धीकरणाचा प्रकल्प अस्तित्वात नसल्याने प्रदूषित पाणी सोडणारे कोण? हे शोधून त्यांचावर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.पाली शहरातील नागरिकांना अंबा नदीच्या पात्रातूनच पाणी पिण्यासाठी व इतर कामांसाठी उपलब्ध करून दिले जाते. अशा प्रदूषित पाण्याचा आपल्या भावी पिढीवर काय परिणाम होईल? या चिंतेत पालीकर आहेत. नागरिकांना शुद्ध पाणी देणे ही स्थानिक स्वराज्य संस्थेची



जबाबदारी आहे. प्रदूषित पाणी पिण्यापेक्षा विहीरीचे पाणी पिण्यावर नागरिकांचा भर आहे. विहिरी या रस्त्यावरच असल्याने, वाहने चुकवत नागरिकांना

.../२

# कळंबुसरे येथील चिरनेर विभागीय सहकारी भात गिरणीची दुरवस्था

**दै.रायगड नगरी । उरण**

सहकार क्षेत्राच्या माध्यमातून उरण पुर्व विभागातील चिरनेर, कळंबुसरे,मोठी जुई सह इतर गावातील नव तरुणांनी आपल्या गावा-तील शेतकरी आणि गरीब बांधवांना सहकार्य, आर्थिक पाठबळ मिळावा यासाठी कळंबुसरे गावात ३० वर्षांपूर्वी चिरनेर विभागीय सहकारी भात गिरणीची उभारणी करण्यात आली होती.परंतु सहकार क्षेत्रातील अधिकारी आणि भात गिरणीचे भाग भांडवलदार यांनी सदर भात भरडाई करणाऱ्या भात गिरणीकडे दुर्लक्ष केल्याने आज सदर भात गिरणीची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून सदर भात गिरणी धुळखात पडून राहिली आहे.

शेतकरी,गरीब बांधवांना सहकार्य, आर्थिक मदत मिळावी यासाठी शासनाने राज्यात ठिकठिकाणी सहकार क्षेत्राच्या माध्यमातून अनेक विकसीत योजना राबविण्याचा संकल्प हाती घेतला.त्याचा एक भाग म्हणून उरण पुर्व विभागातील चिरनेर कळंबुसरे, मोठी जुई सह इतर गावातील कै. अनंत पाटील,यशवंत नारंगीकर, रामभाऊ केणी, दगडूशेठ राऊत, काशिनाथ पाटील सह इतर शेतकऱ्यांनी भाग भांडवलदार, सभासदांच्या पुढाकाराने कळंबुसरे गावात भात गिरणीची उभारणी ३० वर्षांपूर्वी केली. भात भरडाई करणाऱ्या भात गिरणीचा फायदा हा उरण पुर्व विभागातील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात होत असे, परंतु सहकार क्षेत्रातील अधिकारी आणि भात गिरणीचे भाग भांडवलदार यांनी सदर भात गिरणीकडे दुर्लक्ष केल्याने आज भात गिरणीच्या परिसराची,वास्तूची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे.त्यात पावसाळ्यात इमारतीवरील पत्र्याचे छप्पर उडून गेल्याने पावसाचे पाणी गिरणीवर पडून इलेक्ट्रॉनिक वस्तू नादुरुस्त झाली आहे.तरी सहकार क्षेत्रातील अधिकारी आणि भात गिरणीचे भाग भांडवलदार यांनी पुढाकार घेऊन सदर भात भरडाई करणारी भात गिरण पुर्ववत सुरु करण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी मागणी उरण पुर्व विभागातील शेतकरी करीत आहेत.

# काशीद बीच वर पर्यटकांची मांदियाळी

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

पर्यटनात जगाच्या पटलावर नावारूपाला आलेल्या मुरुड तालुक्यातील प्रसिद्ध काशीद बीचवर आज पर्यटकांची गर्दी पाहावयास मिळाली. वाढलेल्या उष्णतेमुळे हैराण झालेले पर्यटकांनी समुद्रात पोहण्याचा मनसोक्त आनंद घेतला. हवामान खात्याने दिलेल्या चक्रिवादळाच्या इशाऱ्या नंतर आज पहाटे पासून संपुर्ण तालुक्यावर ढगाळ वातावरण निर्माण झाले होते. दुपारनंतर तळपत्या सुर्याचे दर्शन होऊ लागले या तळपत्या उन्हात सुद्धा पर्यटकांनी पोहण्याचा मनसोक्त आनंद लुटला.

काशिद-बिच समुद्र किनारा भरतीच्या वेळेस फेसाळणारे पाणी, उसळणाऱ्या लाटा, किनाऱ्यावरील शुभ्र वाळू येथे पर्यटकांना आकर्षित करते.पर्यटकांच्या सोयी-सुविधात याठिकाणी असलेली स्पीडबोट, पॅरेसेलिंगबोट,बनाना, बंफर तसेच घोडा-उंटावरील सफर पर्यटनाचा आनंद द्विगुणीत करते.याचा पर्यटक मनसोक्त आनंद लुटत होते.याठिकाणी विविध खाद्य-पेय चहा-नाष्टा सोयी सुविधा उपलब्ध आहेत. याठिकाणी दर शनिवार, रविवार तसेच सुटीच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर पर्यटक भेट देत असतात. रस्त्यावर दुतर्फा वाहनांच्या रांगा लागलेल्या असतात. वेळप्रसंगी ट्रॅफिक जॅमलाही सामोरे जावे लागते. देश-विदेशातील पर्यटक देखील आवर्जून भेट देत असतात.यामुळे काशिदबीचला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. विकेंड ला शनिवारी व रविवारी काशिद बीच वर पर्यटकांची मांदियाळी दिसून आली.

## दोन मोटार सायकलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरातून दोन मोटारसायकलींची चोरी झाल्याची घटना घडली आहे

गणेश चिकणे यांनी त्यांची सव्वा लाख रुपये किमतीची यामाहा आर १५ मोटार सायकल क्रमांक एम एच ४६ सिसि ५१०८ हि करंजाडे येतील साई कमल ब्रिडींग च्या पार्किंग मध्ये उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने सदर मोटार सायकल चोरून नेली आहे तर दुसऱ्या घटनेत अंकित शर्मा यांची ४०००० रु किमतीची यामाहा कंपनीची मोटार सायकल क्रमांक एम एच ४६ ए एस ८३७१ ही महेश भवन येथे ठेवली असता अज्ञात चोरट्याने सदर मोटार सायकला चोरुन नेली.

## टॅबची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील शिरढोण येथील दिल्ली पब्लिक स्कूल च्या आवारात असलेल्या केबिन मध्ये अज्ञात चोरट्याने प्रवेश करून तेथील टेबलावर ठेवलेला लिनोओ कंपनीचा टॅब चोरून नेला आहे एका अनोळखी इसमाने सदर ठिकाणी आत प्रवेश करून सहा हजार किमतीचा लिनोओ कंपनीचा टॅब चोरून नेला आहे.


## ग्रामपंचायत कोळखे

ता.पनवेल, जि.रायगड

### जाहीर निविदा

दि. १९/०३/२०२२

प्रति,
अधिकृत / अनुभवी ठेकेदार,

यांस कळविण्यात येते की, ग्रामपंचायत कोळखे हद्दीतील २०१९/२०२० मधील १४ व्या वित्त आयोगांतर्गत खालील विकासकामे करावयाची आहेत. त्याकरिता ग्रामंपचायत हद्दीतील अधिकृत/अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामांच्या कोऱ्या निविदा मिळण्याकरिता अर्जाची तारीख दि. २१/०३/२०२२ ते २८/०३/२०२२ पर्यंत या दिवशी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील.

सदर निविदा दि. २९/०३/२०२२ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील. सदर निविदा त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत ३ वाजेपर्यंत उघडण्यात येतील. कामांकरिता लागणारी इसारा रक्कम ग्रामपंचायत कोळखे यांच्या नावाने डिमांड ड्राफ्टच्या द्वारे / रोखीने स्वीकारण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे अगर नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. इसारा रक्कम अंतिम देयकातून कापून घेतली जाईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | इसारा रक्कम १% | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | रा.जि.प.शाळा कोळखे दुरुस्ती व रंगरंगोटी करणे | १०००००/- | १०००/- | २ महिने |

**अटी व शर्ती :-**

१) सर्वांत कमी दराचे अथवा कोणतेही टेंडर मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

२) सदर काम पंचायत समितीकडील बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करणेचे आहे त्याचे मूल्यांकनाप्रमाणे बील अदा करण्यात येईल.

३) काम ज्यांच्या नावे मंजूर होईल त्यांनी नियमा प्रमाणे रूपये १०० स्टॅम्प पेपरवर बॉण्ड करून देणे.

४) कामाचे एस्टीमेंट ऑफिस वेळेत पहावयास मिळेल.

५) दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास बिल अदा करणे अगर न करणे याचा अधिकार ग्रामपंचायतीस राहील.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत कोळखे**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत कोळखे**


# जिल्ह्यातील १०८ क्रमांकावरील रुग्णवाहिका थांबणार

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

नियमित वेतन व कोरोना काळातील बोनस मिळावा आणि पगारवाढ व्हावी या मागण्या पूर्ण होण्यासाठी जिल्ह्यातील १०८ क्रमांक रुग्णवाहिका चालकांनी संबधीत विभागांना निवेदन दिले आहे. येत्या २५ मार्चपर्यंत यावर तोडगा न काढल्यास कामबंद आंदोलन करणार असल्याचा इशारा रुग्णवाहिका चालकांनी दिला आहे.

महाराष्ट्र रुग्णवाहिका १०८ वाहन चालक संघटनेच्यावतीने बी.व्ही. जी.इंडिया लिमिटेड, जिल्हा व्यवस्थापक रायगड अलिबाग, जिल्हा शल्यचिकित्सक सुहास माने, तसेच रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक रायगड यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले आहे. यामध्ये नमूद केले आहे की रायगड जिल्ह्यातील १०८ रुग्णवाहिका वाहन चालक (पायलट) सन २०१४ पासून बी.व्ही.जी.इंडीया लि. कंपनीमध्ये कंत्राटी रुग्णवाहिका चालक म्हणून कामावर रुजू आहेत. पण २०१४ पासून आजपर्यंत आमच्या किमान वेतनात एकही रुपयाची वाढ झालेली नाही. तसेच आम्हाला वेतन कोणत्या स्वरूपात येते याची विचारणा केली असता विचारून सांगतो, उद्या सांगतो, मला माहीत नाही. अशा प्रकारच्या उडवाउडवीची उत्तरे देत आहेत.

जर या विषयाची समाधानकारक उत्तर देण्यास समर्थ नसाल तर वेतन खात्याच्या संबंधित अधिकाऱ्यांसोबत आठ दिवसात रायगड जिल्ह्यामध्ये वाहन चालकांसोबत बैठकीचे आयोजन करण्यात यावे. जर येत्या आठ दिवसांत बैठकीचे आयोजन करण्यात आले नाही. तर ठीक नवव्या दिवशी रायगड जिल्ह्यातील सर्व १०८ वाहन चालक काम बंद आंदोलन करतील आणि या गोष्टीची सर्वस्वी जबाबदारी तुमची असेल असे निवेदनात म्हटले आहे. रुग्णांची गैरसोय होऊ नये, म्हणून निवेदन देत आहोत. आठ दिवसांत मागण्या पूर्ण न झाल्यास कामबंद आंदोलनाचा पर्याय आमच्यासमोर असल्याचे रुग्णवाहिका चालकांचे म्हणणे आहे.

# उतेखोलचा हर्षोल्हासित शिमगोत्सव कटूता राजकारण गटतट बाजुला सरले

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांवचे ग्रामदैवत श्री वाकडाई देवीच्या होळीच्या माळावर यंदा तालुक्यातील मानाची होळी लागली. माणगांवच्या परिसरातील हर्षोल्हासाचे वातावरणात ग्रामस्थ आणि गावातील आबालवृध्द महिला पुरुष तरुणाईसह लहानमुलं आनंदात आकंठ बुडाली. गावात पुन्हा एकदा नवचैतन्य संचारले. गटातटाचे राजकारण चढाओढीत विस्कटलेली मन पुन्हा एकत्र आली. सणावारात कोणीही कोणाचा शत्रू नाही, सर्व आनंदी उत्साही झाले. गाव एकत्र असेल तर, उरतो तो फक्त आनंद आणि जल्लोषच. हेच या सणामुळे सर्वांनी अनुभवले आहे.

गावात यंदा शिमग्याची सोंग आणि पारंपारिक प्रथेला आधुनिकतेची कास धरत, नाविण्यपूर्ण नाच करुन आनंद साजरा केला. बटर बटर.. मुंबई वाल्यांची आली मोटर.. म्हणत लहानग्यांनी निरागस आनंद साजरा केला, तर तरुणींनी अरे सामी, आजा सामी..बलम सामी, परम सामी..सनम सामी..या गाण्यातील पेहराव साड्या परिधान करुन, ताल धरीत शिमग्याच सोंग काढुन घरपट जवळपास दिडशे घराच्या अंगणातून नाचत पोस्त मागितले. एका तरुणाने चक्क यमाचा तर एकाने भुताचा व तरुणीने कलेक्टर बाईंचा बहुरुपी अभिनय सोंग करुन गावकऱ्यांचे खुप मनोरंजन केले. तीन वर्षाच्या प्रदिर्घ कालावधी नंतर अशी मोकळी आनंदोत्सवी होळी साजरी होत आहे. कोरोना प्रतिबंधक मास्क ऐवजी शिमग्याचे मुखवटे तोंडावर बांधुन कोरोना संकटाच्या दुःखद आठवणींचे पवित्र होळीत दहन झाले आहे. होळीचा सण मोठा नाही आनंदाला तोटा..हेच कोकणातील या शिमगोत्सवाला लोकांनी अनुभवले असे म्हणणे वावगे ठरु नये.


अर्जदारातर्फे वकील
पराग दत्तात्रय म्हात्रे

### जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१४४/२०२०
नि.नं.२८/ड
ने.ता.२५/०४/२०२२

श्री.दत्ताराम रामचंद्र घरत, वगैरे — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, कै. कृष्णा भिलू उर्फ मिटू घरत यांचे दि.१०/०९/१९६९ रोजी नवघर, ता.उरण, जि.रायगड येथे निधन झाले आहे. त्यास वारस असलेबाबत दाखला मिळणेकरिता १) श्री.दत्ताराम रामचंद्र घरत, नातू २) श्री.अशोक रामचंद्र घरत, नातू ३) श्री.गणेश रामचंद्र घरत, नातू यांनी मे.दिवाणी न्यायालय, उरण यांचे कोर्टात दाखल केला आहे.

कै.कृष्णा भिलू उर्फ मिटू घरत यांच्या सामाईक मालकीच्या मिळकती माजे : नवघर, ता.उरण, जि.रायगड येथे होत्या. सदर मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**युनिट केस नं.३९१/B**

| अं.क्र. | मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | नवघर | १४२ | २ | ०-०९-७ |

त्यांचे वारसाबाबत, कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्याने ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होवून कागदोपत्री पुराव्यासह हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये मुदतीत हरकती न आल्यास हे मे.कोर्ट कै.कृष्णा भिलू उर्फ मिटू घरत यांचे वारसदार आहेत असे वारस असल्याबाबत त्यांना हा वारस दाखला मंजूर करेल.

आज दि.१०/०३/२०२२ रोजी मे.कोर्टाच्या सही शिक्क्यानिशी देण्यात आली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, उरण** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, उरण**



मे.मुजावर सो

ॲड.धाडस भोपी, पनवेल
अर्जदारांचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.३३६/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२०/०४/२०२२

१) फरिदा अब्दुल करीम काझी
वय : ६८ वर्षे, धंदा : गृहिणी
२) इरफान अब्दुल करीम काझी
वय : ४३ वर्षे, धंदा : नोकरी
३) फैझान अब्दुल करीम काझी
वय : ३९ वर्षे, धंदा : नोकरी
सर्व रा.ए ५०४, पाचवा मजला, एन.एस.व्ह्यू
को.हौ.सो., प्लॉट नं.१४७-१४८, सेक्टर १०
तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०८ — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार क्रं.१ यांचे पती व अर्जदार क्रं.२ व क्रं.३ यांचे वडील पै.अब्दुल करीम अब्दुल लतिफ काझी यांचे पनवेल येथे दि.२०/०७/२०२० रोजी मयत झाले आहेत. पै.अब्दुल करीम अब्दुल लतिफ काझी यांचे मृत्यूपश्चात त्यांना मुस्लीम वारसा कायद्यांतील तरतुदींनुसार अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत. पै.अब्दुल करीम अब्दुल लतिफ काझी यांचे वारसदार म्हणून घोषित होणेकामी अर्जदारांनी अर्ज केलेला आहे. पै.अब्दुल करीम अब्दुल लतिफ काझी यांचे खुद्द मालकीची व त्यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे : तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड, येथील पनवेल महानगरपालिका हद्दीतील ए ५०४, पाचवा मजला, एन.एस.व्ह्यु को.हौ.सो., प्लॉट नं.१४७-१४८, सेक्टर १०, तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०८ अशा वर्णनाची सदनिका**

वर नमूद फरिदा अब्दुल करीम काझी, वगैरे २ हे पै.अब्दुल करीम अब्दुल लतिफ काझी यांचे कायदेशीर वारस आहेत ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट फरिदा अब्दुल करीम काझी वगैरे २ यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर पै.अब्दुल करीम अब्दुल लतिफ काझी यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.१७/०३/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**


पृष्ठ क्र.१ वरुन...

## दंडाच्या नावाखाली पनवेल महानगरपालिकेत होतोय लाखोंचा गैरव्यवहार

जाब विचारला आणि या विषयातील सर्व पुरावे गोळा केले आहेत.

पैसे गोळा करण्याच्या पद्धतीबाबत सांगताना प्रितमम्हात्रे म्हणाले की, ही लोकं सामान्य नागरिकांना हेरतात आणि त्यांना पकडून सांगतात की तुम्ही नियम तोडला आहे. तुम्हाला दोन हजार रुपये दंड आहे, सातशे ते हजार रुपये भरा, तुम्हाला पाचशे रुपयाची पावती अधिकृतपणे मिळेल आणि मास्क न घालने, सार्वजनिक ठिकाणी घाण करणे अशा आरोपामधून निर्दोष सोडण्यात येईल. अशावेळी नागरिकांना घाबरवून रोख रक्कम सातशे ते एक हजार रुपये घेऊन फक्त पाचशे रुपयेची पावती त्यांना देण्यात येते, वरील जादा जमा झालेले दोनशे ते पाचशे रूपयेची रक्कम ही नक्की कोणाच्या खात्यात जमा होते? याची माहिती सामान्य नागरिकांकडे उघड झाली पाहिजे. तसेच यामध्ये प्रशासन किंवा इतरही कोण सामील आहे का? याची सुद्धा चौकशी झाली पाहिजे?

या कामासाठी नेमलेल्या 'मरीन सिक्युरिटी अँड इंटेलिजन्स प्रायव्हेट लिमिटेड' या एजन्सीचे त्वरित काम काढून घेऊन त्यांना दंड सुद्धा आकारण्यात यावा आणि यावर जनतेची लूट केल्याबद्दल फौजदारी गुन्हा देखील दाखल करण्यात यावा अशी मागणी विरोधी पक्षनेते प्रितम जनार्दन म्हात्रे यानी केली आहे.

## गिरणे गाव आता आत्मनिर्भर बनले आहे : खा.सुनील तटकरे

कामाचे उद्घाटन तसेच गिरणे पाणी पुरवठा आरओ प्लॅन्टचे उद्घाटन करण्यात आले. खा.सुनील तटकरे म्हणाले तालुक्यातील असे कुठलेही गाव नाही जिथे मी गेलेलो नाही गिरणे गावामध्ये येण्याचा योग कमी आला सात आठ वर्षांपूर्वी मालाठे गावात आलो होतो, कैलासवासी अशोक शेठ लोखंडे आणि मी एकत्र काम केले लोखंडे यांच्या विचारांचा वारसा जपत मी आज इथपर्यंत पोचलो आहे. आपल्या गावाला समृध्द आत्मनिर्भर होण्यासाठी त्यांनी नेहमीच प्रयत्न केले. आज या ग्रामपंचायतीतील विविध विकासकामांचे लोकार्पण करताना खूप समाधान वाटतं असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी खा.सुनिल तटकरे यांनी मार्गदर्शन करताना सर्वधर्म समभाव, बंधुत्व जपत शहराबरोबरच गाववाड्यांचा विकास गेली तीस ते पस्तीस वर्षे अविरत करत आहे, काही जुने सहकारी दुसऱ्या विचारधारेशी जोडले गेले होते परंतु ते आज राष्ट्रवादी काँग्रेस बरोबर आले आहेत त्यांचे मी स्वागत करतो, १९९२ सालि जिल्हा परिषदेचा अध्यक्ष असल्यापासून क्रितेक वर्ष मतदार संघाचा खुंटलेला विकास करण्याचे भाग्य लाभले आहे. बहुजनांनी मला आपला नेता म्हणून स्विकारले त्या जनतेचे प्रश्न सोडविणे मी माझे कर्तव्य समजतो राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केलेल्या सर्व मान्यवरांचे त्यांनी शाल घालून स्वागत केले व प्रत्येकाला पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी जवाबदारी दिली जाईल असे यावेळी सांगितले. यावेळी भाजपा माज तालुका अध्यक्ष कैलास पायगुडे, गिरणे सरपंच ज्योती कैलास पायगुडे, ग्रामपंचायत सदस्य रमेश लोखंडे, बाळकृष्ण लोखंडे, आदी मान्यवरांसह संपूर्ण गावाने राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला. या कार्यक्रमाच्या पूर्वी मेढे येथील पुलाचे भूमिपूजन, मालाठे येथील डांबरीकरण केलेल्या रस्त्याचे उद्घाटन खा.सुनील तटकरे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

## घरातले प्रदुषित पाणी अंबा नदीत; तेच पाणी पुन्हा नागरिकांच्या घरात

पाण्याची सोय करावी लागत आहे. पाणी भरताना एखाद्याचा अपघात झाल्यास त्याला जबाबदार कोण? हा प्रश्न सध्यातरी अनुत्तरीतच आहे. विहिरी, नद्या यांच्या पाण्याची तपासणी होते का? तपासणी होत असल्यास त्याचा अहवाल नागरिकांना खुला आहे का? असे एक ना अनेक प्रश्न नागरिक दबक्या आवाजात विचारीत आहेत.

प्रशासनाने प्रदूषित पाण्यापासून आमची सुटका करावी असा सुर नागरिकांमधून उमटत आहे.नवनिर्वाचित प्रतींनिधी यावर लवकरच तोडगा काढण्यात यावे अशी मागणी नागरिक करत आहे. तसे न झाल्यास 'नदी उशाशी आणि कोरड घशाशी' असे म्हणण्याची वेळ पालीकरांवर येणार हे मात्र निश्चित. तसेच नागरिक नळपाणी योजनेचे पाणी न वापरता विहीरीचे पाणी वापरत असल्याने 'नागरिकांचा नळाच्या पाण्यावर भरोसा नाय काय?' अशी चर्चा पाली शहरात आहे.


मा.सोनवणे साहेब कोर्ट

अर्जदारातर्फे वकील
श्री.एन.बी.पावशे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.२१०/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.१८/०४/२०२२

श्रीमती.वीणा मार्तंडराव देशमुख
वय : ७४ वर्षे, व्यवसाय : निवृत्त प्राध्यापिका
पत्ता : बी-५/१०, एव्हरस्वीट अपार्टमेंटस,
जे.पी.रोड, बॉन बॉन शॉप जवळ, सात बंगला,
आझाद नगर, अंधेरी (प.), मुंबई, महाराष्ट्र-४०००५३ — अर्जदार
विरुद्ध
१) श्री.नीरज मार्तंडराव देशमुख
वय : ४९ वर्षे, व्यवसाय : नोकरी
पत्ता : बी-५/१०, एव्हरस्वीट अपार्टमेंटस,
जे.पी.रोड, बॉन बॉन शॉप जवळ, सात बंगला,
आझाद नगर, अंधेरी (प.), मुंबई, महाराष्ट्र-४०००५३
२) श्री.निनाद मार्तंडराव देशमुख
वय : ४६ वर्षे, व्यवसाय : नोकरी
पत्ता : बी-५/१०, एव्हरस्वीट अपार्टमेंटस,
जे.पी.रोड, बॉन बॉन शॉप जवळ, सात बंगला,
आझाद नगर, अंधेरी (प.), मुंबई, महाराष्ट्र-४०००५३ — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, ज्याअर्थी कै.मार्तंडराव नारायण देशमुख हे दि.१०/०८/२०२१ रोजी महिमा हॉस्पिटल, मुंबई के वेस्ट वार्ड येथे मयत झाले आहेत. त्याअर्थी अर्जदार यांनी ते कै.मार्तंडराव नारायणराव देशमुख यांचे खालील वर्णन केलेल्या मिळकतीत वारस असले बाबतचा वारस दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

कै.मार्तंडराव नारायणराव देशमुख यांच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**-: सदनिका मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे : खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथील पनवेल महानगरपालिकेच्या अधिकार क्षेत्रातील सेक्टर क्र.३६ येथील भूखंड नं.०३ वर उभारलेली व्हॅली शिल्प नावाची मास हाऊसिंग स्किमच्या इमारत नं.एम-१३ मधील नऊव्या मजल्यावरील सदनिका क्र.९०२, क्षेत्रफळ : ८७.९४८ चौ.मी. बांधीव**

वरील अर्जदार व सामनेवाले हे मयत कै.मार्तंडराव नारायणराव देशमुख यांचे कायदेशीर वारसदार आहेत, या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या कोर्टात एक महिन्याच्या आत हजर राहून हरकत घ्यावयाची आहे. याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर हे मे.कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेण्याची कार्यवाही करील आणि ते जर कै.मार्तंडराव नारायणराव देशमुख यांचे वारस असल्याचे शाबीत झाल्यास त्यास वारसदाखला मंजूर करील, याची दखल घ्यावी.

आज दि.१७/०३/२०२२ रोजी माझी सही, न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



अर्जदाराचे अधिवक्ता
जयेश संभाजी म्हसे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.जिल्हा न्यायाधिश पनवेल रायगड यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.२०/२०२२
ने.ता.२१/०४/२०२२

१) श्रीमती.सुषमा देवानंद कोळी
वय : ४२ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
अर्जदार क्र.१ स्वतःकरिता व अर्जदार क्र.२ व
अर्जदार क्र.३ ची पालनकर्ती आई म्हणून
२) कुमारी समृद्धी देवानंद कोळी
वय : १६ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
३) कुमारी संस्कृती देवानंद कोळी
वय : १२ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
सर्व रा.२०३, जुई-सरोवर दर्शन बिल्डींग, अल्मेडा रोड,
टीएमसी जवळ, चंदनवाडी, ठाणे-४००६०२ — अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार यांस १) कुमारी समृद्धी देवानंद कोळी, २) कुमारी संस्कृती देवानंद कोळी अशा दोन मुली आहेत. अर्जदार आणि १) कुमारी समृद्धी देवानंद कोळी, २) कुमारी संस्कृती देवानंद कोळी यांचे नावे खालील वर्णनाची अविभक्त सामाईक हिश्याची मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : धामोते, ता.कर्जत, जि.रायगड येथील बिनशेती मिळकत**

| अ.क्र. | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र चौ.मीटर | आकार रुपये पैसे |
|---|---|---|---|
| १ | ४२/४/अ/३ | ३२६ चौ.मी. | ३२-६० |

(जिचा उल्लेख येथून पुढे पुनरुक्ती टाळण्याच्या उद्देशाने ''अर्ज मिळकत'' असा केलेला आहे.)

वर वर्णन केलेली मिळकत १) कुमारी समृद्धी देवानंद कोळी, २) कुमारी संस्कृती देवानंद कोळी यांचे पालनपोषणाकरिता, त्यांच्या पुढील महाविद्यालय आणि उच्च शिक्षणाकरिता आणि अर्जदार यांच्या आर्थिक अडचणीपोटी विक्री करणेची आहे. त्याप्रमाणे अर्जदार यांनी १) कुमारी समृद्धी देवानंद कोळी, २) कुमारी संस्कृती देवानंद कोळी यांच्या अर्ज मिळकतीमधील असलेल्या अविभक्त हिश्याची नैसर्गिक पालक म्हणून विक्री करणेकरिता परवानगी मिळणेसाठी या मा.न्यायालयामध्ये अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये केलेल्या मागणीप्रमाणे अर्जदार यांच्या हक्कास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास तसे त्यांनी लेखी पुराव्यासह या मा.न्यायालयात सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास हे मा.न्यायालय पुरावा घेवून योग्य वाटल्यास अर्जदार यांस १) कुमारी समृद्धी देवानंद कोळी, २) कुमारी संस्कृती देवानंद कोळी यांची नैसर्गिक पालक म्हणून अर्ज मिळकतीमधील १) कुमारी समृद्धी देवानंद कोळी, २) कुमारी संस्कृती देवानंद कोळी यांचा अविभक्त हिस्सा विक्री करणेची परवानगी देईल. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

**सही/-** **क.लिपीक** **जिल्हा न्याया.पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **जिल्हा न्याया.पनवेल**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## ह भ प वैभव महाराज पवार यांची नर्मदा परिक्रमा यशस्वी

**दै.रायगड नगरी । चौक**

श्री क्षेत्र ओंकारेश्वर पासून सुमारे तीन हजार सहाशे कि. मी. च्या पायी नर्मदा परिक्रमेचा प्रवास ह.भ. प. वैभव महाराज पवार यांनी पार पडला. यावेळी बोलताना पवार यांनी अतिशय खडतर कठीण असणारी परिक्रमा पूर्ण करताना येणारे अनुभव कथन केले श्री क्षेत्र ओंकारेश्वर येथून दिनांक २४ नोव्हेंबर मध्ये सुरुवात केली असून मध्य प्रदेश, गुजरात, आणि महाराष्ट्रातील काही भागातून पायी चालत समुद्र तट मार्गे पुन्हा उत्तर तटावर आले तेथून नर्मदा मौर्य उगम स्थान अमरकंटक येथे दिनांक ७ मार्च रोजी श्री क्षेत्र ओंकारेश्वर येथे पुन्हा येऊन परिक्रमा पूर्ण केली व आपल्या गावी चौक येथे त्यांनी आगमन केले .नर्मदा परिक्रमा पूर्ण झाल्यावर आनंदाश्रू वाहू लागले संपूर्ण परिसराचे व उगम स्थानाचे पूजन करून जो ध्यास घेतला होता तो पूर्ण झाल्याने मन भरून आले वैभव महाराज पवार यांनी आपला परिवार मागे सोडत गेले तीन-चार महिने अखंड अध्यात्मात आपले जीवन झोकून दिले होते.प्रत्येक वेळी आपल्या सुश्राव्य किर्तनातून अध्यात्माची गोडी लागावी व आपले जीवन परमार्थासाठी काहीतरी केले पाहिजे हे सांगताना नर्मदा परिक्रमेचा आपण विचार करीत असून ते पूर्ण करणे हेच आपले पुढे ध्येय असणार आहे आपले गुरुवर्य वडील ह.भ. प. गोपाळ महाराज पवार यांच्या आशीर्वादाने व त्यांच्या मार्गदर्शनाने मी हा प्रवास यशस्वी केला आहे.असे ते म्हणाले.

## स्कुटीला अज्ञात वाहनाची धडक १ ठार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

डी पॉईंटकडून जेएनपीटीकडे जाणाऱ्या रोडने पुष्पकनगर ब्रिजवर स्कुटीला पाठीमागून अज्ञात वाहनाने धडक दिली. या धडकेत सुधीर पुंडलिक पाटील (वय ४५) घेसरगाव, निळजे यांचा मृत्यू झाला आहे. अज्ञात वाहनचालकाविरोधात शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. होंडा एक्टिवा स्कूटी क्रमांक एम एच ०५ एस २६०६ ही घेऊन सुधीर कुंडलिक पाटील निघाले होते. पुष्पकनगर पुलावर त्यांना पाठीमागून एका अज्ञात वाहनाने धडक दिली. यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. अज्ञात वाहनचालक वाहनासह पळून गेला आहे.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# भाजपला मात देणे शक्य! काँग्रेस महाराष्ट्र प्रदेश सेक्रेटरी तथा रायगड सहप्रभारी : श्रीरंग बरगे

**दै.रायगड नगरी । आगरदांडा**

विरोधी मतांची विभागणी, पैशांचा वापर आणि प्रसिद्धीच्या जोरावर भाजपचे पूर्ण देशात १३०० आमदार निवडून आले आहेत. मात्र देशात आजही भाजप खेरीज इतर पक्षांचे सुमारे दोन हजार आमदार आहे. त्यामुळे आपण सर्वांनी निर्धार व परिश्रम केले तर भाजपला मात देणे अशक्य नाही, असे मत काँग्रेसचे रायगड सहप्रभारी श्रीरंग बरगे यांनी येथे व्यक्त केले. सभासद नोंदणी अभियानाच्या निमित्ताने ते मुरुडच्या वसंतराव नाईक महाविद्यालय येथे बोलत होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मुरुड-एकदरा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच- मोतीराम पाटील यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.



काँग्रेस महाराष्ट्र प्रदेश सेक्रेटरी तथा रायगड सहप्रभारी - श्रीरंग बरगे पुढे म्हणाले की नरेंद्र मोदी यांनी देशासाठी कोणतेही भरीव काम केले नाही, फक्त आयत्या पिठावर रेघोट्या ओढल्या आहेत. स्वातंत्र्यापूर्वी भारतात सुई सुद्धा बनत नव्हती, त्या पार्श्वभूमीवर देशाच्या आजच्या प्रगतीत काँग्रेसचाच मोठा वाटा आहे. पण आता परिस्थिती बदलल्याने पक्षकार्यकर्त्यांनी खचून जाऊ नये. कार्यकर्ते हाच पक्षाचा पाया असल्याने काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी पक्षाचा जनाधार वाढविण्यासाठी व काँग्रेसला पुन्हा उर्जितावस्था यावी यासाठी अथक प्रयत्न करणे जरुरी असल्याचे बरगे म्हणाले. भाजपला १९८४ मध्ये प्रथमच लढविलेल्या लोकसभा निवडणुकीत फक्त दोन जागा मिळाल्या. तरीही वाजपेयी-आडवाणी यांनी खचून न जाता प्रचंड मेहनत करून आजच्या पक्षाच्या विजयकळसाचा पाया रचला. काँग्रेस कार्यकर्त्यांनी देखील ताज्या पराजयानंतर अजिबात खचून न जाता पुन्हा एकदा जोमाने कामाला लागले पाहिजे. कार्यकर्त्यांनी विचारधारा कायम ठेऊन काळानुरूप बदलले पाहिजे. विजयासाठी फक्त नेत्यांवरच विसंबून न राहता कार्यकर्त्यांनीही मेहनत घेतली पाहिजे, यावरही बरगे यांनी भर दिला. भाजपला पाशवी बहुमत मिळत असल्याने काँग्रेसची समर्थ विरोधी पक्ष म्हणून जबाबदारी वाढली आहे. गेली काहीवर्षे ती जबाबदारी राहुल गांधी यांनी संसदेत व्यवस्थित पार पाडली आहे. फक्त निवडणूक जिंकण्यासाठी जे मार्केटिंग व अर्थकारण लागते त्यात काँग्रेस कमी पडायला लागली आहे. भाजपला सत्तेवरून घालविण्यासाठी नेत्या-कार्यकर्त्यांनी जनतेत जाऊन लोकांची कामे केली पाहिजेत. पण सध्या प्रसिद्धीचा जमाना असल्याने त्या कामांची प्रसिद्धीही केली पाहिजे. समाजमाध्यांचा जनतेवर मोठा प्रभाव पडत असल्याने अनेक निवडणुकामध्ये सिद्ध झाले आहे.तेथेही आपले विचार मांडले पाहिजेत, असेही ते म्हणाले.आजही देशातील पंजाब, हरियाणा, राजस्थान, गुजरात, मध्यप्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्र, कर्नाटक, केरळ, गोवा आदी राज्यांमध्ये काँग्रेसला मोठा जनाधार आहे. त्याचे प्रतिबिंब तेथील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येही उमटले आहे. आजही अनेक राज्यात नंबर दोनचा पक्ष म्हणून काँग्रेसच आहे.आज देशात भाजपचे एकूण १३७३ आमदार असून एकट्या काँग्रेसचे ६९२आमदार आहेत. भाजपखेरीज इतर सर्व प्रमुख पक्षांचे मिळून सुमारे दोन हजार आमदार आहेत. मात्र मतांच्या फाटाफुटीमुळे भाजपचे जास्त आमदार निवडून येतात, हे आताच्या उत्तर प्रदेश निवडणुकीतही दिसून आले.जय , पराजय हा प्रक्रियेचा भाग आहे. त्या मुळे एका पराभवाने खचून न जाता स्थानिक पातळीवरही गटा तटात विभागलेल्या नेत्यांना व कार्यकर्त्यांना एकत्र आणण्यासाठी काँग्रेस कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा. मला पूर्ण खात्री आहे २०२४ च्या निवडणुकीत राहूल गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसपक्ष उभारी घेईल, असा विश्वासही या वेळी बरगे यांनी व्यक्त केला.

या वेळी मुरुड तालुका काँग्रेसचे अध्यक्ष -सुभाष महाडिक, ॲड.इसमाईल घोले, वासंती उमरोटकर, विश्वास चव्हाण, श्रीकांत गुरव, सुदेश वाणी, प्रीतम पाटील, अस्लम हळदे, हुमन राईट्स तालुका अध्यक्ष -शकील कडू,लहु रावजी,अतिष अग्रावर, चिंतामणी मकु,आसलम हालडे, आदी पदाधिकारी हजर होते. यावेळी महाराष्ट्र प्रदेश सेक्रेटरी-श्रीरंग बरगे यांनी जिल्हा काँग्रेस कमेटीची घोषणा करुन निवृत्ती पत्र देण्यात आले. डॉ.विश्वास चव्हाण यांना रायगड जिल्हा काँग्रेस उपाध्यक्ष पदी,वासंती उमरोटकर जिल्हा महिला उपाध्यक्ष पदी,प्रितम पाटील -जिल्हा उपाध्यक्ष पदी,सुदेश वाणी- जिल्हा जनरल सेक्रेटरी पदी,आसलम हालडे जिल्हा जनरल सेक्रेटरी पदी, चिंतामणी मकु- जिल्हा जनरल सेक्रेटरी पदी निवड करण्यात आली.

## खारघरच्या डोंगरावर लागलेल्या आगीबद्दल चौकशी करून गुन्हा दाखल करण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर मधील डोंगरावर लागलेल्या आगीसंदर्भात उच्चस्तरीय चौकशी करून संबंधितांवर गुन्हा दाखल करावा व पर्यावरणाचा विध्वंस करणाऱ्या व खारघर डोंगरावरील वनसंपदा, पक्षी, प्राणी याना आगीत भस्मसात करणार्यांवर कायदेशीर कायमस्वरूपी प्रतिबंधात्मक कारवाई करण्याची मागणी शिव-सेना जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी खारघर पोलिसांकडे केली आहे.

दोन दिवसांपूर्वी खारघरमधील डोंगरावर मोठ्या स्वरूपात आग लागली. या आगीत मोठ्याप्रमाणावर डोंगरावर राहणारे पशुपक्षी, प्राणी होरपळून मृत्युमुखी पडले. दरवर्षी खारघर डोंगरावर काही अज्ञात गुंड व अपप्रवृत्तीच्या व्यक्तींकडून आग लावण्यात येते. त्यानंतर बेसुमार वृक्षतोड करण्यात येते. स्थानिक वन अधिकारी याला जबाबदार असल्याचे बोलले जात आहे.

खारघरमध्ये लागलेली आग ही पूर्वनियोजित असावी, आग आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन गाड्या व मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ लागले. तरी ही आग आटोक्यात आलेली नव्हती. या प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करून गुन्हा दाखल करावा अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

## राणेचीवाडी येथे मुलांनी उभारले शेतकरी वडिलांचे स्मारक

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुक्यातील नगरपंचायत हद्दीतील राणेचीवाडी येथील जगदीश, जयेश, भास्कर, गोळे यांनी वडीलांचे स्मारक उभारून जन्म दात्या आ वडीलांच्या स्मृती चीर तरुण (जागृत) रहाव्यात या उद्देशाने पंचमुखी मारूती मंदिरा शेजारी काल स्मृति दिनी उभारले.

यापूर्वी गेल्या वर्षी शेतकरी आदिवासी बांधवांना फावडे पिकाव, घमेले झाडू असे साहित्य वाटप करून वर्ष स्मृती दिन साजरा केला होता. मात्र यावेळी स्मारक उभारले. आजच्या काळात आई वडिलां प्रती असणारी आस्था, प्रेम, आत्मियता बदलत्या काळानुसार लोप पावत चालली आहे पैसा म्हणजे सर्वस्व समजणारे बिलंदर असतात. पण या मुलांनी वेगळा आदर्श निर्माण केला आहे. याचे सर्वत्र केले जात आहे. कै.नारायण गोळे हे दानशूर, प्रचंड कष्टाळू व हाडाचे शेतकरी म्हणून परिचित होते. हलाकीचे दिवस असताना देखील अनेक संकटांना तोंड देऊन त्यांनी शेती हा पारंपरिक व्यवसाय जोपासलाआजच्या काळात माणूस आपली एक इंच जागा देखील सोडत नाही मात्र नारायण गोळे यांनी गावातील पंचमुखी मंदिरासाठी स्वतःची चार गुंठे जागा गावासाठी दान स्वरूपात दिली.त्यांचीही दानशूर वृत्ती जनसामान्यांपर्यंत पोहचावी.

शेती पुरक व्यवसाय दुधाचा असल्याने म्हैस गोठा अशी कला दाखवली आहे. सदरचा पुतळा तळा येथील जे जे स्कूल ऑफ आर्ट्सचा विद्यार्थी आकाश सतीश शिंदे यांनी साकारली आहे. या स्मारकाचे उद्घाटन आपली आई गं.भा.शेवंती नारायण गोळे यांच्या हस्ते केले. गोळे बंधूंच्या आपल्या वडीलांप्रति असलेला प्रेमाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.




---

श्री.मुजावर साहेब कोर्ट

अर्जदाराचे वकील : सुशांत बालाजी पुरी

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.प्रधान दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दिवाणी संकीर्ण / चौकशी अर्ज १८३०/२०२१

नि.नं.१४/ड

ने.ता.२१/०४/२०२२

श्रीमती.रुची नितीन सिंहा वगैरे २ — अर्जदार

विरुद्ध

श्री.सचिन धीरेंद्र सिन्हा — सामनेवाले

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ यांची सख्खी आई आहे. अर्जदार क्र.३ हे अर्जदार क्र.१ यांचे सासरे आणि अर्जदार क्र.२ यांचे आजोबा आहेत. अर्जदार हे शिर्षक कलमातील पत्यावरील म्हणजेच ए २०१, रिद्धी को.ऑप.हौसिंग सोसायटी, प्लॉट नं.१९/२०, आयबीपी पेट्रोल पंपासमोर, सेक्टर १३, खांदा कॉलनी, न्यू पनवेल (पश्चिम) रायगड ४१०२०६ येथील कायमचे रहिवासी आहेत.

१) अर्जदार क्र.१ यांनी स्वतःकरिता आणि अर्जदार क्र. २ ही अज्ञान असल्याने तिची पालनकर्ती आई म्हणून अर्जदार क्र.१ यांनी हा अर्ज दाखल केलेला आहे. त्या अर्जातील स्थावर व जंगम मिळकती खालीलप्रमाणे :-

स्थावर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

नवीन पनवेल येथील सेक्टर १३ विभागातील प्लॉट क्र.१९ आणि २० एकूण क्षेत्र २१७३.४२१ चौरस मीटर्स या मिळकतीवर बांधण्यात आलेली इमारत जी रिद्धी कॉम्प्लेक्स या नावाने ओळखली जाते त्या इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील दुकान गाळा क्र.१२१ क्षेत्र १९६ चौरस फूट कारपेट करारामध्ये नमूद स्टॅटयुटोरिअल एरिया १८० चौरस फूट असा आहे.

**जंगम मिळकत खालीलप्रमाणे :-**

| अ.क्र. | बँकेचे नाव व शाखा | खाते क्रमांक व रक्कम |
|---|---|---|
| १ | **अभ्युदय को.ऑप.बँक लि. शाखा-नवीन पनवेल** Log Term (Subordinated) Deposit (Series I) Certificate | LTD-1/142/2643 **रुपये १,५०,०००/-** |
| २ | **पोस्ट ऑफिस पनवेल** | 3047898197 **रुपये ४,५०,०००/-** |
| ३ | **पोस्ट ऑफिस पनवेल** | 3044633135 **रुपये ७,००,०००/-** |
| ४ | **पोस्ट ऑफिस पनवेल** | 3030097248 **रुपये ३,५०,०००/-** |

२) अर्जदार क्र.१ यांचे पती आणि अर्जदार क्र.२ यांचे पिता आणि अर्जदार क्र.३ यांचा ज्येष्ठ पुत्र श्री.नितीन धिरेंद्र सिन्हा यांचे दि.१२ मे २०२१ रोजी अर्जदार यांचे शीर्षक कलमातील पत्यावर निधन झाले आहे.

३) सदरील अर्जदार क्र.३ धिरेंद्र प्रसाद सिन्हा यांची पत्नी आणि अर्जदार क्र.२ कुमारी.अदिती नितीन सिन्हा यांची आजी आणि अर्जदार क्र.१ रुची नितीन सिन्हा यांची सासू सौ.इंदु धिरेंद्र सिंहा या दि.७ जुलै २०२१ रोजी व्ही. आय.आर. हॉस्पिटल पनवेल येथे निधन पावलेल्या आहेत.

४) सामनेवाला सचिन धिरेंद्र सिन्हा हा अर्जदार क्र.३ यांचा सख्खा मुलगा असून अर्जदार क्र.१ यांचे दीर (अर्जदार क्र.१ यांच्या मृत पतीचा भाऊ) आणि अर्जदार क्र.२ यांचा सख्खा काका आहे. सदरील सामनेवाला हा शिर्षक कलमातील पत्यावर अमेरिका येथे राहत असल्यामुळे सदरील अर्जावर सही करण्यास हजर राहून न शकल्याने त्यांना सामनेवालेपणात सामील केलेले आहे.

५) सदरील अर्जदार १) श्रीमती.रुची नितीन सिंहा २) कुमारी.अदिती नितीन सिंहा ३) धिरेंद्र प्रसाद सिन्हा आणि सामनेवाला हेच कै.इंदु धिरेंद्र सिन्हा यांचे वारस आहेत. तसे हिंदू वारसा कायदा कलम ३७२ अन्वये वारस दाखल्यासाठी अर्ज या मा.न्यायालयात दाखल केलेला आहे. सबब, अर्जदार यांचे वारस हक्कास जर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी ती हरकत आमचेकडे लेखी पुराव्यासह ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत नोंदवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास हे मा.न्यायालय पुरावा घेवून योग्य वाटल्यास अर्जदार यांस वारस दाखला देईल. मागाहून कोणाचीही हरकत आल्यास ती विचारात घेतली जाणार नाही.

आज दि.१९ मार्च २०२२ रोजी आमच्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल — (कोर्टाचा शिक्का) — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल

---

अर्जदारातर्फे वकील

ॲड.पराग दत्तात्रय म्हात्रे

### जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.१४३/२०२०

नि.नं.३३/ड

ने.ता.२५/०४/२०२२

श्री.दत्ताराम रामचंद्र घरत, वगैरे — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, कै. देवकाबाई रामचंद्र घरत यांचे दि.०४/०१/२०१८ रोजी नवघर, ता.उरण, जि.रायगड येथे निधन झाले आहे. त्यास वारस असलेबाबत दाखला मिळणेकरिता १) श्री.दत्ताराम रामचंद्र घरत, मुलगा २) श्री.अशोक रामचंद्र घरत, मुलगा ३) श्री.गणेश रामचंद्र घरत, मुलगा यांनी मे.दिवाणी न्यायालय, उरण यांचे कोर्टात दाखल केला आहे.

कै.देवकाबाई रामचंद्र घरत यांच्या सामाईक मालकीच्या मिळकती मौजे : नवघर, ता.उरण, जि.रायगड येथे होत्या. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः-

**युनिट केस नं.२९/८३ नवघर**

| अं.क्र. | मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | नवघर | ८९ | ११ (२) | ०-३-० |
| २ | नवघर | ९५ | ३ (१) | ०-३-१० |

**युनिट केस नं.१/८२-८३ नवघर**

| अं.क्र. | मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | नवघर | ३ | ६ | ०-२-० |
| २ | नवघर | २१ | १ (२) | ०-५-१० |
| ३ | नवघर | २१ | ७ | ०-१-० |

**युनिट केस नं.२९/८५ नवघर**

| अं.क्र. | मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | नवघर | ७० | ४/२ | ०-०४-८ |
| २ | नवघर | ५६ | १२/२ | ०-०२-२ |
| ३ | नवघर | ११० | २/२ | ०-०९-१ |
| ४ | नवघर | ११० | २/२ | ०-०४-८ |
| ५ | नवघर | ८ | ५ | ०-०७-५ |
| ६ | नवघर | १० | ३ | ०-०२-० |
| ७ | नवघर | ४६ | ३/२ | ०-१३-९ |
| ८ | नवघर | ११८ | २/२ | ०-०२-३ |
| ९ | नवघर | २७९ | ९/२ | ०-०२-४ |
| १० | नवघर | २८७ | १२ | ०-०७-० |
| ११ | नवघर | २७९ | २/२ | ०-०२-२ |

**युनिट केस नं.३९१/B**

| अं.क्र. | मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | नवघर | १४२ | २ | ०-०९-७ |

**युनिट केस नं.३९१/A**

| अं.क्र. | मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | नवघर | ११९ | ११ | ०-०४-१२ |

त्यांचे वारसाबाबत, कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्याने ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होवून कागदोपत्री पुराव्यासह हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये मुदतीत हरकती न आल्यास हे मे.कोर्ट कै.देवकाबाई रामचंद्र घरत यांचे वारसदार आहेत असे वारस असल्याबाबत त्यांना हा वारस दाखला मंजूर करेल.

आज दि.१०/०३/२०२२ रोजी मे.कोर्टाच्या सही शिक्क्यानिशी देण्यात आली.

सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, उरण — (कोर्टाचा शिक्का) — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, उरण

---

राव साहेब

अर्जदारातर्फे वकील

ॲड.मानसी देशपांडे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर सो.यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज नं.३६७/२०२२

नि.नं.८/ड

ने.ता.२७/०४/२०२२

१) श्रीम.प्रतिमा जयेश शहा
वय : ५४, धंदा : गृहिणी
रा.पी-स्वप्नलोक सोसायटी निवास कानोरिआ,
अंकलेश्वर, भरुज, गुजरात
२) श्री.धृवीत जयेश शहा
वय : ३२, धंदा : व्यवसाय
रा.पी-स्वप्नलोक सोसायटी निवास कानोरिआ,
अंकलेश्वर, भरुज, गुजरात
३) श्री.मृगेन जयेश शहा
वय : २६, धंदा : व्यवसाय
रा.पी-स्वप्नलोक सोसायटी निवास कानोरिआ,
अंकलेश्वर, भरुज, गुजरात — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी कै. जयेश किर्तनलाल शहा हे दि.२९/०४/२०२१ रोजी रा.कॉ.ऑप एच.एस. जी.एस.ओ.सी. निवास कानोरिया कॉलनी जलधारा चोकडी, जी.आय.डी.सी. ११०८ अंकलेश्वर भुरुज गुजरात येथे मयत झाले. वरील अर्जदार क्र.१ ही मयत जयेश किर्तनलाल शहा यांची विधवा पत्नी आहे. अर्जदार क्र.२ व ३ ही मयत जयेश किर्तनलाल शहा यांची मुले आहेत. मयत कै.जयेश किर्तनलाल शहा यांचे नावावर मौजे : पाली बुद्रुक,भिंगार आणि वारदोली, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णन केलेल्या जमीन मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | गावाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ आर.चौ.मी. | आकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | पाली बुद्रुक | २४ | ५ | ०-०२-००<br>०-०२-००<br>एकूण ०-०४-०० | ०.०६ |
| २ | पाली बुद्रुक | १७० | १ | ०-०२-००<br>०-००-००<br>एकूण ०-०२-०० | ०.०३ |
| ३ | भिंगार | १७७ | ४ | ०-३०-१०<br>०-०२-००<br>एकूण ०-३२-१० | ६.९४ |
| ४ | भिंगार | १७७ | १/२ | ०-४०-००<br>०-००-५०<br>एकूण ०-४५-५० | ८.०० |
| ५ | भिंगार | २९ | १ | ०-०१-००<br>०-१९-००<br>एकूण ०-२०-०० | ०.०६ |
| ६ | वारदोली | ३६ | २ | ०-०२-००<br>०-००-००<br>एकूण ०-०२-०० | ०.१२ |

वरील प्रमाणे जमीन मिळकतीचे वर्णन आहे.

याबाबत कोणत्याही व्यक्तीला अगर कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १ महिन्याचे आत मे.कोर्टात हजर राहून हरत घ्यावयाची आहे. तरी, याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्यापूर्वी कोणत्याही प्रकारची लेखी/तोंडी हरकत आली नाही, तर हे मे.कोर्ट वरील अर्जदार कै.जयेश किर्तनलाल शहा यांचे वारस असल्याबाबत पुढील कार्यवाही करील. तसेच कै.जयेश किर्तनलाल शहा यांचे वारस असल्याचे शाबीत झाल्यास अर्जदार यांना वारस दाखला मंजूर करील याची दखल घ्यावी.

आज दि.१९/०३/२०२२ रोजी माझी सही, न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल — (कोर्टाचा शिक्का) — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल

---

राव साहेब

अर्जदारातर्फे वकील

ॲड.सारिका शेगट-लबडे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर), पनवेल यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.३७५/२०२२

नि.नं.८/ड

ने.ता.२७/०४/२०२२

१) श्री.दत्तात्रेय नारायण बावलेकर
वय : ३७ वर्षे, धंदा : नोकरी/शेती
२) श्रीमती.पार्वती नारायण बावलेकर
वय : ५६ वर्षे, धंदा : गृहिणी
३) श्रीमती.जयश्री गणेश बावलेकर
वय : ४५ वर्षे, धंदा : गृहिणी
४) कु.अक्षय गणेश बावलेकर
वय : २२ वर्षे, धंदा : नोकरी
५) कु.मयुरी गणेश बावलेकर
वय : १९ वर्षे, धंदा : शिक्षण
६) श्रीमती.रंजना रामचंद्र बावलेकर
वय : ५४ वर्षे, धंदा : गृहिणी
७) श्री.सुरेंद्र रामचंद्र बावलेकर
वय : २६ वर्षे, धंदा : नोकरी
८) श्री.संकेत रामचंद्र बावलेकर
वय : २० वर्षे, धंदा : नोकरी
अर्जदार क्र.१ ते ८ रा.मु.कासप,
पो.आपटे, ता.पनवेल, जि.रायगड
९) सौ.सीताबाई काशिनाथ भौंड
पुर्वाश्रमीची सिताबाई भाऊ बावलेकर
वय : ६७ वर्षे, धंदा : वयोवृद्ध
रा.मु.लाडीवली, पो.गुळसुंदे, ता.पनवेल, जि.रायगड
१०) सौ.लक्ष्मी चारु जमदाडे
पुर्वाश्रमीची लक्ष्मी भाऊ बावलेकर
वय : ७५ वर्षे, धंदा : वयोवृद्ध
रा.मु.नेरे, वरची आळी, साईबाबा मंदिराजवळ,
माथेरान रोड, ता.पनवेल, जि.रायगड
११) सौ.वंदना नामदेव बोंबाले
पुर्वाश्रमीची वंदना भाऊ बावलेकर
वय : ६१ वर्षे, धंदा : वयोवृद्ध
रा.मु.चावंडोली, कराडे बु., विठ्ठल मंदिरा जवळ,
पो.गुळसुंदे, ता.पनवेल, जि.रायगड
१२) सौ.गिता जगन्नाथ चव्हाण
पुर्वाश्रमीची गिता भाऊ बावलेकर
वय : ६० वर्षे, धंदा : वयोवृद्ध
रा.मु.बोरगाव खुर्द, पो.वावरले, साईबाबा मंदिराजवळ,
माथेरान रोड, ता.खालापूर, जि.रायगड — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी कै.मनुबाई उर्फ मनीबाई भाऊ बावलेकर ही दि.२७/११/२००१ रोजी मरण पावली आहे व ज्याअर्थी सदर मयत मनुबाई उर्फ मनीबाई भाऊ बावलेकर यांच्या मृत्यूपश्चात त्यांच्या मालकीची मिळकती महाराष्ट्र इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट ॲक्ट १९६१ च्या तरतुदींप्रमाणे पाताळगंगा एम.आय.डी.सी.करिता संपादीत करण्यात आल्या आहेत.

**संपादीत मिळकतीचे वर्णन**

**मौजे : कासप, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| अ. क्र. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र ए.गुं.आणा | आकार | नुकसान भरपाईची एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३४ | २ अ | ०-७५-५ | ५-५७ | ५५,११४=४७ |

आता सदर संपादीत मिळकतीच्या संपादनापोटी एम.आय.डी.सी. सदर मयत मनुबाई उर्फ मनीबाई भाऊ बावलेकर यांस वरील मिळकतीचे संपादनापोटी मिळणारा भूखंड सदर अर्जदारांस मिळणेकरिता त्यांनी ते मयत मनुबाई उर्फ मनीबाई भाऊ बावलेकर हिचे वारस असल्याबाबत वारस दाखला मिळण्याकरिता या मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने / इसमांनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्याचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.१९ माहे ०३ सन २०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — (कोर्टाचा शिक्का) — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# निवडणुका लांबणीवर : माथेरानमध्ये पक्ष प्रवेशांची मालिका तात्पुरती बंद

**दै.रायगड नगरी । माथेरान**

नियोजित वेळेत नगरपरिषदेच्या निवडणुका होणार नसून आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्यातील सर्व भागातील निवडणूक प्रक्रिया लांबणीवर गेल्याने मतदारांमध्ये प्रचंड नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

डिसेंबर २०२१ या महिन्याच्या अखेरीस माथेरान मधील सत्ताधारी गटाचा कार्यकाळ संपुष्टात आल्यानंतर इथे प्रशासक राजवट लागू करण्यात आली आहे.माथेरान नगरपरिषदेच्या निवडणुकीचे वारे जानेवारी २०२१ पासुनच जोराने वाहू लागले होते. ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्यात अन्य पक्षातील कार्यकर्ते आपल्या पक्षात खेचुन आणण्यासाठी इथे रस्सीखेच सुरू झाली होती. अनेक कार्यकर्त्यांना आमिषे देऊन आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी काही पक्षाच्या नेत्यांनी आपली प्रतिष्ठा पणाला लावली होती. तर काही पक्षाच्या नेत्यांनी याकडे पूर्णतः दुर्लक्ष करून जे खरोखरच आपल्या पक्षाशी एकनिष्ठ आहेत त्यांच्यावर विश्वास ठेवून आपली कामे करण्यात मग्न झालेले दिसत होते. त्यातच निवडणुका लांबणीवर गेल्याने ज्या ज्या कार्यकर्त्यांना आपल्या पक्षात धरून बांधून प्रवेश दिले गेले आहेत त्यांच्या मागण्या पाहता नेत्यांना खूपच तारेवरची कसरत करावी लागली होती.माथेरान नगरपरिषदेची निवडणूक जवळपास सहा महिने उशिरा होणार असल्याचे बोलले जात असल्याने पक्षप्रवेश केलेल्या नवख्या कार्यकर्त्यांना सर्वंकष दृष्टीने सांभाळणे म्हणजे एकप्रकारे अग्निदिव्य पार करावे लागणार असून त्या कार्यकर्त्यांचे पालनपोषण करणे खूपच त्रासदायक ठरणार आहे. विविध कार्यक्रमांचे आयोजन करताना कार्यकर्त्यांची संख्या ही केवळ शक्तिप्रदर्शन दाखवण्यासाठी अपेक्षित असते त्यामुळेच प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांना दुरावल्यास याचा फटका निवडणूक काळात नक्कीच होऊ शकतो. तर ज्यांचे अद्यापही पक्षात प्रवेश झालेलं नाहीत आणि एकप्रकारे स्वतःची कमांड ठेवण्याची अभिलाषा ज्यांना अंगीकृत आहे अशा कार्यकर्त्यांना एकतर पक्षात समाविष्ट करणे आवश्यक आहे



अन्यथा बाहेरून पाठिंबा देऊन आपली आर्थिक सुबत्ता वाढविण्यासाठी निवडणूक काळात ते कार्यकर्ते नेहमीप्रमाणे नेत्यांना वेठीस धरण्यास सज्ज असतात. याचा दांडगा अनुभव सर्वच नेत्यांना ज्ञात आहे. अन्य पक्षातील कार्यकर्ते आपल्या पक्षाकडे खेचले म्हणजे पुढील सत्तेचे आपणच दावेदार आहोत या भ्रमात सुध्दा नेत्यांनी न राहता एक एक कार्यकर्त्यांची पारख निवडणुकीच्या काळातील आपल्या नेहमीच्या गुप्तचरांकडून प्राप्त करणे गरजेचे बनले आहे.

आजची सद्यपरिस्थिती पाहता कोणत्याही पक्षातील कार्यकर्त्यांचे वाढदिवस साजरे करण्यासाठी सुध्दा एकप्रकारे स्पर्धा लागलेली आहे. परंतु नेत्यांना ठाऊक नाही की आपण ज्या कार्यकर्त्यांचे वाढदिवस साजरे करत आहोत ते नक्की आपल्या पक्षाशी एकसंध आहेत की अन्य पक्षाला आपल्या गुप्तता देण्यासाठी सोबत पाठविलेले आहेत. २०१६ च्या निवडणुकीवेळी आपल्या पक्षाशी फितुरी करून आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी आर्थिक लाभ उठवून सत्तांतर घडविण्यासाठी ज्या ज्या कार्यकर्त्यांनी कठोर परिश्रम घेतले होते त्यांची यादी सर्वच नेत्यांना ठाऊक आहे.राज्यात जरी युत्या आघाड्या जाहीर करण्यात आलेल्या असल्या तरी सुद्धा याठिकाणी प्रत्येक पक्ष्याच्या नेत्यांची आणि कार्यकर्त्यांची मत मतांतरे विभिन्न आहेत त्यामुळे राज्यात जाहीर झालेल्या युत्या आणि आघाड्या इथे मान्य होतील हे सांगणे कठीण आहे.राजकीय मंडळींसाठी नगरपरिषद ही एकप्रकारे दुभती गाय बनली आहे त्यामुळेच नगरपरिषदेच्या सभागृहातील सत्तेच्या माध्यमातून पदोपदी आर्थिक लाभ होत असल्याने राजकारण हे एकप्रकारे व्यवसायाचे साधन बनलेले आहे.पूर्वीचे आणि आताचे राजकारण यात मोठया प्रमाणात तफावत दिसत असून काही वर्षांपासून याठिकाणी समाजकारणाला थारा नाही. एकनिष्ठ कार्यकर्ता क्वचितच इथे पहावयास मिळत आहेत तर मानापमान सहन करून सुध्दा केवळ पोटाची खळगी भरण्यासाठी लोकप्रतिनिधींनी सुध्दा आपले हात टेकलेले याठिकाणी जनतेने उघड्या डोळ्यांनी पाहिले आहे. पक्षावरील निष्ठा, तत्वे, आणि नैतिकता लोप पावली आहे त्यामुळे मागील काळात ठराविक रक्कमेसाठी काही लोकप्रतिनिधींना ज्या ज्या मतदारांनी निवडून दिले होते त्यांच्या स्वप्नांना तिलांजली दिली होती.पुढील आगामी निवडणुकीचे उमेदवार आपणच असणार या अविर्भावात आजही सध्याचे माजी लोकप्रतिनिधी दिसत आहेत. परंतु मतदार राजा सुध्दा यावेळी अशा महाभागांना आ-पली जागा दाखविण्यासाठी सज्ज झालेले आहेत असे सुज्ञ मतदार अप्रत्यक्षपणे बोलून दाखवत आहेत.

## संक्षिप्त...

### पनवेलमध्ये आई व सावत्र वडीलांविरोधात गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

१७ वर्षीय मुलीला शिक्षण सोडून बारमध्ये कामाला जा असे सांगून सतत मारहाण व घाणेरड्या भाषेत शिवीगाळ करणाऱ्या आई आणि सावत्र वडीलांविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सतरा वर्षे तरुणी पनवेल परिसरात राहत असून दहावी इयत्तेत शिकते. तिची आई व सावत्र वडील हे मागील काही महिन्यांपासून तिला शाळा सोडून दे आणि बारमध्ये जाऊन काम कर व पैसे कमव असे सांगत होते. मात्र तिला शिक्षण पूर्ण करायचे असल्याने कामाला जाणार नाही असे तिने सांगितले. यावेळी आई तिला मारहाण करायची तसेच आई व सावत्र वडील घाणेरड्या भाषेत शिवीगाळ करायचे. त्यांच्या होणाऱ्या त्रासाला कंटाळून ती तिच्या मैत्रिणीच्या घरी निघून गेली होती. पोलिसांनी शोध घेऊन आई-वडिलांना समजावले व घरी घेऊन जाण्यास सांगितले. मात्र आईने तिला घरी घेऊन जाण्यास नकार दिल्याने ती मावशीकडे राहायला गेली. मावशी तिला पनवेलला घेऊन आली. मात्र आईने घरी घेण्यास नकार दिला. त्यामुळे आई शारून आंग्रे व सावत्र वडील राहुल गोसावी (वय ४५) यांच्याविरोधात पनवेल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# दहावी बारावी परीक्षा काळात ग्राहकांचा विजपुरवठा खंडित करु नका : भा.ज.पा.तर्फे मुरुडच्या महावितरणला निवेदन

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

दहावी बारावी परीक्षा काळात मुरुड शहरासह तालुक्यातील ग्राहकांचा विजपुरवठा खंडित करु नये. यासाठी भारतीय जनता पार्टीचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष ड.महेश मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर यांच्या सल्लयानुसार ज्येष्ठ नेते जनार्दन सदाशिव तथा आण्णा कंधारे व मुरुड तालुका कार्यकारिणी यांनी महावितरण चे वीज अभियंता यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे मागणी केली आहे.



सद्यस्थितीत संपूर्ण राज्यात इ.१० वी.व इ.१२ वी.च्या परीक्षा सुरू झालेल्या आहेत. त्यातच मार्च अखेर असल्याने तर अधिकारी वर्गावर आर्थिक समतोल राखण्यासाठीचा प्रयत्न चालू आहे. परंतु नागरिकांनी वेळोवेळी येत आमच्याशी सदर गोष्टीसाठी वारंवार मागणी केली. त्यावर आज भारतीय जनता पार्टी दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष ॲड. महेश मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच तालुका अध्यक्ष महेंद्रजी चौलकर यांच्या सल्लयानुसार सदर अधिकारी वर्गाची प्रत्यक्ष भेट घेऊन चर्चा विचार विनिमय करण्यात आला तसेच केवळ विद्यार्थी हा भविष्याचा केंद्रबिंदू असून त्यांचा भविष्याचा विचार करून सदर ग्राहकांची वीजबिल थकबाकी असली तरी परीक्षा संपेपर्यंत नागरिकांना नोटिसा देण्यात याव्यात. परंतु वीजपुरवठा खंडित करण्यात येऊ नये. अशी विनंती निवेदनाद्वारे ज्येष्ठ नेते आण्णा कंधारे यांनी केली. यावर सदर अधिकारी वर्गाने तुमच्या निवेदनाचा नक्कीच विचार होईल तसेच एखाद्या कुटुंबात विद्यार्थी असेल तर वीज पुरवठा खंडित करणार नाही असे आश्वासन यावेळी दिले. याबाबत सर्व उपस्थितांनी महावितरण अधिकारी व विभागाचे आभार व्यक्त केले.

यावेळी भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर, संघटन सरचिटणीस प्रवीण बैकर, ज्येष्ठ नेते तथा जिल्हा कार्यकारिणी सदस्य जनार्दन सदाशिव तथा आण्णा कंधारे, उपाध्यक्ष विनोद भगत, हनिफ उलडे, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# आमदार चषक कबड्डी स्पर्धा : मिडलाईन कर्जत विजेता

**दै.रायगड नगरी । कर्जत**

भैरवनाथ क्रिडा मंडळ देऊळवाडी व शिव-सेना शाखेच्या वतीने आमदार चषक २०२२ या जिल्हा स्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत मिडलाईन कर्जत संघाने बाजी मारत प्रथम क्रमांकावर शिक्कामोर्तब केले. विशेष म्हणजे कर्जत, अलिबाग व महाडच्या आमदारांची उपस्थिती विशेष लक्षणीय ठरली.

देऊळवाडी शिवसेना शाखेच्या माध्यमातून जिल्हा स्तरीय कबड्डी स्पर्धा आमदार चषक २०२२ चे आयोजन केले होते. याप्रसंगी स्थानिक आमदार महेंद्र थोरवे, अलिबाग विधानसभेचे आमदार महेंद्र दळवी, महाड विधानसभेचे आमदार भरत गोगावले, भारत श्री अमोल आंग्रे, बैलगाडा शर्यत महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष पंढरीनाथ फडके व महाराष्ट्राचा महागायक वैभव थोरवे, जिल्हा सल्लागार बबनदादा पाटिल, भरत भगत, भाई गायकर, संतोष भोईर, मनोहर थोरवे, रत्नाकर बडेकर आदींच्या उपस्थितीत गुणवंत विद्यार्थी व रायगड भुषण पुरस्काराने गौरविण्यात आलेल्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

या जिल्हा स्तरीय कबड्डी स्पर्धेत मिडलाईन कर्जत प्रथम, जय हनुमान चरी द्वितीय, गणेश क्लब उरण तृतीय तर सुर्योदय पोसरी चतुर्थ क्रमांकाचा मानकरी ठरला. यामध्ये सर्वोत्कृष्ट खेळाडू बिपीन तळे, उत्कृष्ट चढाई भारत पाटिल, उत्कृष्ट पक्कड कल्पेश थोरवे तर उत्कृष्ट खेळाडू म्हणून प्रशांत जाधव याला सन्मानित करण्यात आले. यावेळी बोलताना आमदार थोरवे यांनी 'कर्जत तालुका क्रीडा संकुलासाठी पाच कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करण्यात आला आहे.' असे स्पष्ट केले. आमदार चषक हि जिल्हा स्तरीय कबड्डी स्पर्धा यशस्वी



करण्यासाठी विकास बडेकर, योगेश बडेकर, रत्नाकर बडेकर, सागर बडेकर, सुयोग गायकर, जयेश बडेकर, शरद बडेकर, साईनाथ श्रीखंडे, शत्रुघ्न बडेकर, सुमित बेडेकर, पप्पू पाटील, रोहित तुर्भे, विनोद बडेकर, अनिकेत बडेकर आदिंसह ग्रामस्थांनी विशेष मेहनत घेतली.

### ड्रायव्हरचा हलगर्जीपणा; हायवेवरून टँकर २० फूट खाली कोसळला

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पुण्याहून मुंबईला निघालेल्या केमिकल भरलेला टँकर एक्सप्रेस हायवेवरील पनवेलजवळील नेवाळी ब्रिजजवळ आला असता चालकाच्या हलगर्जीपणामुळे रस्तासोडून २० फूट खाली कोसळल्याने टँकरचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या अपघातात चालक अरविंद यादवयाला आपला जीव गमवावा लागला आहे. या अपघातात टँकरची पुढील चाके निखळली असून बाजूला फेकली गेली आहेत. यावरून या अपघाताची भीषणता दिसून येते. चालक अरविंद यादव वय ४२ हा हाजीमलंग रोड कल्याण येथील रहिवासी आहे. सदर अपघाताबाबत खांदेश्वर पोलीस ठाणे पनवेल येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





# द ग्रेट इंडियन ट्रॅव्हलने केला १९ हजार पेक्षा जास्त किलोमीटरचा प्रवास; आ.प्रशांत ठाकूर यांनी केले कौतुक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

द ग्रेट इंडियन ट्रॅव्हलने ०१ डिसेंबर २०२१ पासून ११ मार्च २०२२ पर्यंत दे-शातील सर्व राज्यांचा समावेश करून १९ हजार पेक्षा जास्त किलोमीटरचा प्रवास केला असून नुकताच या प्रवासाचा समारोप खारघर येथे पार पडला. या कार्यक्रमासाठी प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी त्यांनी या मोहिमेचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.



यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, नगर-सेवक अभिमन्यू पाटील, प्रवीण पाटील, अनिता पाटील, नेत्रा पाटील, माजी नगर-सेवक गुरुनाथ गायकर, जिल्हा चिटणीस गीता चौधरी आदी उपस्थित होते. द ग्रेट इंडियन ट्रॅव्हल ही १०१ दिवसांची रोड ट्रिप मोहीम होती. जी कोविडमुळे प्रभावित झालेल्या लहान आणि सूक्ष्म व्यवसायांना मदत करण्यासाठी, सर्व भारतीय राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये, भारत आणि तिची संस्कृती, परंपरा, रीतिरिवाज, पाककृती अशा विविध बाबतीत प्रेरक ठरली. या मोहिमेदरम्यान रोटरी क्लब, रोटरॅक्ट क्लब, एनजीओ क्षेत्र आणि स्टार्ट अप्स आणि लहान व्यावसायिक समुदायांसारख्या विविध आंतरराष्ट्रीय संस्थांमधील ८०० पेक्षा जास्त समविचारी लोकांच्या भेटी झाल्या व त्यामध्ये एकमेकांचे विचार मांडण्यात आले. सपोर्ट युअर बिझनेस या आशयाच्या माध्यमातून सर्व पार्श्वभूमीतील लोकांना सक्षम करणे आणि त्यांच्यासाठी त्यांच्या व्यवसायाचा प्रचार आणि वाढ करण्यासाठी नेटवर्क स्थापन करण्याचे ध्येय आहे जे एक नेटवर्क प्लॅटफॉर्म आहे ज्याचे नेतृत्व तिचे संस्थापक संचालक रिंकी वनमोरे, सुश्री मदीहा शेख आणि कौस्तव घोष करतात. मोहिमेचे कारण लहान व्यवसायांना पाठिंबा देणे आणि त्यांचे ब्रँड आणि प्रयत्न ओळखणे हे असून द ग्रेट इंडियन ट्रॅव्हल या मोहिमेमध्ये एक संघ असून त्यामध्ये कौस्तव घोष हे संस्थापक, लक्ष्मी सोरते सह-संस्थापक, आर्या नायर जनसंपर्क आणि विपणन, भाविक देशमुख नेव्हिगेटर, अनित कौर बंगा विचारवंत, संशोधन आणि विकास, रितांशू शर्मा मीटिंग समन्वयक, सावराब समता वेबसाइट विकसक, तरुण मिश्रा ग्राफिक डिझायनर/ व्हिडिओ मेकर, अभिषेक वाळेकर वाहन ब्रँडिंग, शीतल सिरसीकर वाहन ब्रँडिंग म्हणून काम पाहतात.

# बेकायदेशिर सावकारी व्यवसाय केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

वैध अनुज्ञप्तीशिवाय सावकारीचा व्यवसाय केल्याप्रकरणी प्रवीण नावंधर यांच्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र सावकारी नियमनद्ध अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, पनवेल येथील सहकार अधिकारी श्रेणी-१ नीता पुगावकर यांच्याकडे पनवेल येथील आयडीबीआय बँक जवळ सर्वेशवर निवास, तळमजला येथे खाजगी अवैध सावकारी करण्यात येत असल्याबाबत तक्रार करण्यात आली. पोलीस बंदोबस्तात प्रवीण नवंधर यांच्या घराची झडती घेण्यात आली. त्यानुसार तक्रारदार व इतर लोकांना व्याजाने पैसे देणे गहाणखत तसेच पंचनाम्यामध्ये काही आक्षेपार्ह डायऱ्या व त्यातील नोंदी ह्या बेकायदेशीर सावकारी व्यवहार करत असल्याचे दिसून आले. यावेळी तक्रारदार व इतर व्यक्ती यांचे काही कोरे बॉण्ड पेपर, कोरेचेक, इतर व्यक्तींच्या सह्या असलेले तसेच कर्जदाराने कर्जाने घेतलेल्या रकमेच्या संबंधी सावकार व कर्जदार यांच्यामध्ये व्याजाचा उल्लेख असलेले गहाणखत प्राप्त झाले. ताब्यात घेतलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करून त्यामध्ये प्रवीण नावंधर यांनी अवैध अनुज्ञप्ती शिवाय सावकारीचा व्यवसाय केल्याचे दिसून आले.

# प्रवाशी निवारा शेड नसल्याने प्रवासी सोसताहेत उन्हाचे चटके

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

मुंबई-गोवा महामार्गावरील वाकण नाका हा अंत्यत महत्वाचा नाका मानला जातो. अष्टविनायकापैकी पाली येथील बल्लाळेश्वर गणपती मंदिर तसेच पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या मुरुड- जंजिरा व श्रीवर्धन कडे जाण्यासाठी वाकण नाक्यावरुनच जावे ला-गते. परंतु महामार्गाचे काम सुरु झाल्यापासून आजपर्यंत वाकण नाक्यावर वाहनांची वाट बघणा-या प्रवाशांसाठी शेड नसल्याने प्रवाशांना मोठ्या प्रमाणात उन्हाचे चटके सहन करावे लागत आहे. त्यामुळे प्रवाशांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

महामार्गाचे काम सुरु झाल्यापासून वाकण नाक्यावरती वाहनांची वाट बघत उभे राहणा-या प्रवाशांना प्रवाशी शेड नसल्यामुळे तसेच वातावरणातील वाढत्या उष्णतेमुळे मोठ्या प्रमाणात उन्हाचे चटके सहन करावे लागत आहेत. महामार्गाचे काम सुरु होण्याआधी महामार्गाच्या बाजुला असणा-या झाडांच्या सावलीचा आधार प्रवाशांना उभे राहण्यासाठी असायचा. परंतु महामार्गाच्या कामासाठी संपुर्ण झाडे तोडण्यात आल्यामुळे पावसाळ्याच्या दिवसात तसेच सद्यपरिस्थितीत भंयकर अशा उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये प्रवाशी वर्गाला मोठ्या संकटाचा सामना करावा लागत आहे. या उन्हामध्ये वाहनांची वाट बघत राहणा-या अनेक प्रवाशांनमध्ये चक्कर येऊन पडण्याची संख्या देखील वाढलेली आहे. त्यामुळे वाकण नाक्यावरती प्रवाशी शेड नसल्यामुळे प्रवाशी वर्गांतुन नाराजीचे सुर उमटत आहेत. दरम्यान वाकण नाक्यावरती तात्पुरती का होईना महामार्गाच्या दोन्ही बाजूला प्रवाशांना उभे राहण्यासाठी काही तरी उपाययोजना करुन प्रवाशी शेड उभारण्यात यावी अशी मागणी प्रवाशी व नागरिकांमधून होत आहे.



# घड्याळ व ब्ल्युटूथ स्पीकरची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कंपनीच्या वेअर हाऊसमध्ये असणाऱ्या बोट कंपनीच्या डिजिटल स्मार्ट वॉच व ब्लूटूथ स्पीकरचे कार्टून काढून त्यातून एक लाख ३९ हजार रुपये किमतीचे वॉच, ब्लूटूथ स्पीकरची चोरी केल्याप्रकरणी तिघांविरोधात शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पाडेघर जेडब्ल्यू आर कंपनी येथे मालाच्या गोडाऊनवर लक्ष ठेवण्याकरता ११४ सिक्युरिटी गार्डची नेमणूक करण्यात आली आहे. चायना देशातून बोट कंपनीचे ब्लूटूथ स्पीकर आणि वॉच आयात करण्यात आले होते. हे सील तोडून वेअर हाऊसची पाहणी केली असता वेअर हाऊसमधील कार्टून फाटलेले दिसून आले. त्यावेळी वेअरहाऊसमध्ये चोरी झाली असल्याचे प्रवीण वर्तक यांच्या लक्षात आले. संकेत रामटेके (ऊरण), मिथुन म्हात्रे (ऊरण) आणि अनिकेत पारधी (वज्रेश्वरी) यांच्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.


सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूसंपादन विभागातर्फे साडेबावीस टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना वाटपाबाबत अटी व हरकती प्राप्त करण्याकरिता प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता (चौ.मी.) | वाटपपत्र देण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | भूखंडाच्या वाटपाशी संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार वाटपाशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नोड - पुष्पक नोड (उलवे) | | | | | | | | |
| १ | ५०/ NUR | मौजे-गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड निवाडा क्र. ४०/२०२१ | २९०/२ | ०-१९-७ | ३२० चौ.मी. | पुष्पक नोड उलवे येथील भूखंड क्र. १२B, सेक्टर-२६, क्षेत्र ३२० चौ.मी. | श्री. प्रकाश कृष्णाजी घरत<br>श्री. संतोष कृष्णाजी घरत | निरंक |
| | | | एकूण क्षेत्र | ०-१९-७ | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसाच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात, अर्ज व पूरक कागदपत्रांसह बाब निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करुन पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**
भूसंपादन विभाग, १ ला मजला, सिडको भवन,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अपर जिल्हाधिकारी तथा**
**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/४६६/२०२१-२२